# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

ग्राहक तक्रार क्र. १६/२००६/ दिनांक :

१) श्री. विठ्ठलराव गोपाळराव तेरवाडकर,
मु,पो. तिल्याळ, ता. जत,
जि. सांगली.

तक्रारदार

**<u>विरूध्द</u>**

१) कार्यकारी अभियंता(का) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.विद्युंत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली.

२) कार्यकारी अभियंता,
म.रा.विद्युंत वितरण कंपनी मर्यादित,
संवसु ग्रामीण विभागीय कार्यालय,
विश्रामबाग, सांगली

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.विद्युंत वितरण कंपनी मर्यादित,
संवसु उपविभागीय कार्यालय,
जत, जि. कोल्हापूर

४) सहाय्यक अभियंता,
म.रा.विद्युंत वितरण कंपनी मर्यादित,
संवसु उपविभाग, संख, ता.जत, जि. सांगली.

विरूध्द पक्षकार

**<u>कोरम :–</u>** १) श्री. एम.बी. भाजीभाकरे, सदस्य–सचिव
२) श्री. जी.सी. लेले, सदस्य

<u>महाराष्ट्र वीज नियामक आयोग</u>
(ग्राहक तक्रार निवारण मंच व ओम्बुड्समन)
विनियम २००३ मधील ८.२ चे तरतूदीनुसार.

(अ) ग्राहक गा–हाणे निवारण मंच, कोल्हापूर परिमंडल, कोल्हापूर मंचाचे अध्यक्ष या पदाचा अतिरिक्त भार असलेल्या पदाचा व या मंचाचा सदस्य–सचिव म्हणून मी माझे मत खालील प्रमाणे नोंदवित आहे –

श्री. विठ्ठलराव गोपाळराव तेरवाडकर, मु,पो. तिल्याळ, ता. जत, जि. सांगली तिल्याळ येथे त्यांचे गट नं. ५० मध्ये ३ एच.पी. शेतीपंपासाठी विद्युत पुरवठा व्हावा म्हणून रितसर अर्ज सहाय्यक अभियंता, उपविभाग, जत यांचेकडे मागणी अर्ज केला. तथापि वीज वितरण कंपनीने त्यांच्या वीज जोडणी मागणीकडे दुर्लक्ष केले आहे. श्री. तेरवाडकर यांनी वीज वितरण कंपनी सांगली मंडल कार्यालय अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्षाकडे 'क्ष ' प्रपत्रामध्ये अर्ज केल्याचे नमूद केले आहे. तथापि सदर व्यवस्थेने वीज नियामक आयोगाने निर्देश केलेल्या कार्यप्रणालीचा अंमल न केल्याने श्री तेरवाडकर यांनी कोल्हापूर परिमंडलातील ग्राहक तक्रार निवारण मंचाकडे 'अ' प्रपत्रामध्ये २३/३/२००६ रोजी तक्रार दाखल केली आहे. वीज नियामक आयोगाच्या तरतूदीनुसार मंचाने तक्रारदार व वीज वितरण कंपनीच्या सांगली मंडलामधील सर्व संबंधितांना आपले म्हणणे मांडण्यासाठी दि. २३/५/२००६ रोजी हजर राहण्याचे कळविले. त्यानुसार दि. २३/५/२००६ रोजी सुनावणी झाली. त्यात दोन्ही पक्षकारांनी आपापली बाजू मांडली. ग्राहकाचा व वीज वितरण कंपनीचा सर्व पत्रव्यवहार बघता खालील प्रमाणे तक्रारीचे सर्वसाधारण स्वरूप आहे.

श्री. विठ्ठलराव गोपाळराव तेरवाडकर, मु,पो. तिल्याळ, ता. जत, जि. सांगली, यांच्या तक्रारीचे स्वरूप असे की, तक्रारदार यांनी त्यांचे गट नं ५० मध्ये ३ एच.पी. शेती पंपाचे वीज कनेक्शन मिळणेसाठी दिनांक १४/८/१९९९ रोजी पैसे भरले आहेत व दि १९/२/२००४ रोजी चाचणी अहवाल सादर केला आहे महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग २००५, विद्युत परवाने धारकांच्या कृती मानकांप्रमाणे कोणत्याही ग्राहकास विद्युत पुरवठा तीन महिन्यांचे आत करणेचा आहे. परंतु आजपावेतो विद्युत पुरवठा मिळाला नसल्याने विनियम २००५ च्या अंमलबजावणी पासून विलंबाच्या प्रत्येक आठवडयास किंवा त्याचा भागास रूपये १००/– या प्रमाणे वीज वितरण कंपनीने भरपाईची आदेश देण्याची मागणी केली आहे.

तसेच वितरण कंपनीतर्फे वि.प.क्र १ म्हणजेच कार्यकारी अभियंत, मंडल कार्यालय, सांगली यांनी तक्रारदाराचे कनेक्शन हे आर.ई.सी. एस.पी.ए. योजने अंतर्गत मंजूर झाले असून त्यासाठी ७ पोल (३७५ मीटर) इतक्या लाईनची उभारणी करणेची गरज आहे व वितरण कंपनीस त्याकरिता रू. ४३,२००/– इतका खर्च अपेक्षित आहे. वितरण कंपनी अशा शेतीपंपाच्या विद्युतीकरणासाठी ग्रामीण विद्युतीकरण महामंडळ, दिल्ली यांचेकडू कर्ज घेऊन विद्युतीकरणाचे काम पूर्ण करीत असते व वितरण कंपनीकडे अशा कामासाठी स्वत:चा असा निधी उपलब्ध नाही. सद्या संख उपविभागामध्ये सदर तक्रारदाराच्या कनेक्शनचा प्रतिक्षा यादी मध्ये २५७ अनुक्रमांक आहे मुख्य अभियंता, कोल्हापूर यांचे पत्र क्र. २४३१ दि. २८/३/२००५ नुसार शेतीपंपाचे उर्जिकरणाचे काम प्रतिक्षा यादीप्रमाणे करण्याचे आहे. सदर यादीप्रमाणे २५७ कनेक्शन देणेकरिता वितरण कंपनीस सर्वसाधारणपणे रूपये ९० लाख इतका खर्च अपेक्षित आहे व सांगली जिल्हासाठी सन २००५–०६ सालाकरिता २५९५ कृषीपंपाचे उद्दिष्ट (ओ.आर.सी. स्कीम सोडून) होते व प्रत्यक्षात ३३४० इतक्या शेतीपंपाचे उर्जिकरण करण्यात आले असे वि.प.क्र. १ यांनी त्यांचे म्हणणे सुनावणीच्या दिवशी मांडले आहे.

तसेच तक्रारदार यांचेवतीने श्री विलासराव जगताप, यांनी सुनावणीच्या दिवशी असे प्रश्न विचारले की, सहाय्यक अभियंता, संख यांनी पत्र क्र. १०६० दि. ९/९/२००४ ने आपण दि १४/८/१९९९ रोजी शेतीपंप कनेक्शनसाठी पैसे भरले आहेत व आपले काम लवकरच हाती घेणेत येत आहे तरी आपण विद्युत पंप संच मांडणीचा चाचणीचा अहवाल त्याचप्रमाणे मोटर व कॅपॅसिटर खरेदी पावतीची झेरॉक्स संख उपविभागीय

कार्यालयास १५ दिवसांचे आत सादर करावी असे कळविले व त्याप्रमाणे तक्रारदार यांनी १९/९/२००४ रोजी सर्व बाबींची



पूर्तता केली आहे तसेच त्यांनी एम.ई.आर.सी. व आय.ई. ॲक्ट २००३ नुसार जेष्ठता यादीची तरतूद आहे काय ? असा प्रश्न उपस्थित केला आहे.

यावर वि.प.क्र. १ यांचे असे प्रत्युत्तर आहे की, एम.ई.आर.सी. व आय.ई. ॲक्ट २००३ च्या कायद्यानुसार जेष्ठता यादीचा लिखीत उल्लेख नाही परंतू नैसर्गिक न्यायाच्या तत्वानुसार व मुख्य कार्यालयाचे परिपत्रकाप्रमाणे जेष्ठता यादीनुसार कनेक्शन दिली जातात.

तसेच जत तालुक्यामध्ये दोन उपविभाग कार्यरत असून ३५६१ अर्जदारांनी शेतीपंपासाठी पैसे भरले असून प्रत्यक्षात फक्त १०७५ अर्जदारांनी चाचणी अहवाल सादर केले आहेत. सद्या जत तालुक्यासाठी ग्रामीण विद्युतीकरण महामंडळाकडून ५८४ पंप उर्जिकरणाची योजना उपलब्ध आहे. याशिवाय ५०० पंपाची योजना मंजुरीकरिता ग्रामीण विद्युतीकरण महामंडळ, दिल्ली येथे मंजुरीसाठी पाठविली आहेत व त्याचा पाठपुरावा चालू आहे थोडक्यात जत तालुक्यात चालू वर्षी १०८४ पंपाचे उर्जिकरण करणेकरिता स्कीम कव्हरेज उपलब्ध होईल

ग्रामीण विद्युतीकरण महामंडळाकडून कर्जाऊ निधी मंजूर करून घ्यावा लागेल व ती कर्जाऊ रक्कम शासनाची हमी मिळाल्यानंतर हप्त्या हप्त्याने वीज वितरण कंपनीस प्राप्त होतो, त्यामुळे शेती पंपाचे उर्जिकरण निधी उपलब्धतेवर अवलंबून आहे. मा. संचालक (संचलन), मुंबई, यांचे पत्र क्र. ६८४९ दि. १७/३/२००६ अन्वये निधीच्या उपलब्धतेनुसार राज्य शासनामार्फत ठरवून दिलेल्या वार्षिक उद्दिष्टानुसार शेती पंपाचे उर्जिकरण करण्यात येते. सन २००५-०६ करिता सांगली जिल्ह्यासाठी २५९५ शेतीपंपाचे उद्दिष्ट (ओ.आर.सी. स्कीम सोडून) होते व प्रत्यक्षात ३३४० इतक्या शेतीपंपाचे उर्जिकरण करण्यात आले.

तसेच एखाद्या अर्जदारास तातडीने वीज कनेक्शन हवे असल्यास महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठयाच्या इतर अटी विनियम २००५) च्या कलम ३.३ अन्वये अंदाजपत्रकातील सर्व रक्कम वितरण कंपनीकडे भरल्यास किंवा लाईनचे काम स्वत: केल्यास वितरण कंपनी अशा अर्जदारास तातडीने एम.ई.आर.सी. च्या कृती मानकेनुसार कनेक्शन देऊ शकेल लाईनचे काम स्वत: केल्यास अंदाजपत्रकीय रकमेच्या १५ टक्के रक्कम सुपरव्हिजन चार्जेस म्हणून वितरण कंपनीकडे भरणा करावे लागतील, असे वितरण कंपनीचे म्हणणे आहे.

तेंव्हा वरील तक्रारदाराचे व सर्व वि.प.ंची सर्व कागदपत्रे, लेखी म्हणणे, तक्रार अर्ज इ. चे तपशील पाहता या मंचाचे असे मत आहे की -

१. श्री. विठ्ठलराव गोपाळराव तेरवाडकर, रा. तिल्याळ, ता.जत, जि.सांगली, यांनी त्यांचे गट क्र. ५० मध्ये ३ एच.पी. शेतीपंप कनेक्शनकरिता दि. १४/८/१९९९ रोजी पैस भरले.
२. सहाय्यक अभियंता, उपविभाग जत यांनी पत्र क्र. १०६० दि. ९/९/२००४ अन्वये श्री. तेरवाडकर यांना कळविले की, ही नोटीस पोहोचताच १५ दिवसांचे आत आपण विद्युत संच मांडणीचा चाचणी अहवाल त्याचप्रमाणे मोटर व कपॅसिटर खरेदी पावतीची झेरॉक्स कार्यालयास सादर करावा व आपल्याला लवकरच विद्युत पुरवठा करणेचे काम हाती घेणेत येणार आहे. सदर पत्रान्वये तक्रारदार यांनी दि. १९/९/२००४ रोजी सर्व कागदपत्रांची पुर्तता केलेली आहे

म.रा.वि.नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता व पुरवठयाच्या इतर अटी) विनियम २००५ मधील कलम ४.४अन्वये अधिनियम किंवा त्याखाली करण्यात आलेले नियम आणि विनियम किंवा त्यावेळी अस्तित्वात असणा

–या कायद्यात अन्य तरतूद नसल्यास वितरण परवानाधारक “जेथवर शक्य असेल तेथवर “ वीज दराच्या प्रत्येक वर्गवारीतील प्रथम आलेल्यास प्रथम  या तत्वावर विजेचा पुरवठा करील.



परंतू असे की, अधिनियमाच्या कलम ४३ व अधिनियमाखाली करण्यात आलेल्या विनियमामध्ये नमूद केलेल्या कालमर्यादेत विजेचा पुरवठा करण्याचे बंधनास अधिन राहून वितरण परवानधारक वीज पुरवठयाबाबत वितरण परवानेधारकाच्या अन्य कोणत्याही खास योजने अंतर्गत विजेची जोडणी देऊ शकेल.

तसेच विद्युत अधिनियम २००३ चे कलम ४३.२ पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या परिवास्तूस वीज पुरवठा करण्याकरिता विद्युत संयंत्राची किंवा विद्युत वाहिनीची आवश्यकता असेल तर ते पुरवणे हे प्रत्येक वितरक लायसनसदाराचे कर्तव्य असेल.

परंतू कोणतीही व्यक्ती, जर तो समुचित आयोगाकडून निर्धारित करण्यात येईल अशी किंमत लायसनदारास प्रदान करण्यासाठी सहमत नसेल तर, स्वतंत्र वीज पुरवठा असणा–या कोणत्याही परिवास्तूसाठी, कोणत्याही लायसनदाराकडून वीज पुरवठयाची मागणी करण्यास किंवा नियमीतपणे विद्युत पुरवठा मिळण्यास हक्कदार असणार नाही.

तसेच महाराष्ट्र वीज नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता) कलम ४.३.४ नुसार अर्जदाराने विनंती केल्यास त्यास त्याच्या अर्जाची सद्य:स्थिती आणि तो अद्याप निकाली निघाला नसल्यास व त्याची कारणे असल्यास ती कळविण्याचे लायसनदाराचे कर्तव्य राहील.

सदर केसमध्ये श्री. तेरवाडकर यांनी दि. २/११/२००५ रोजी विद्युत नियामक आयोगाकडे केलेल्या अर्जावर वि.प.क्र. १ म्हणजेच कार्यकारी अभियंता, मंडल कार्यालय, सांगली, यांना त्यांची सद्य:स्थिती पत्र क्र. ०९८७ दि. ३/२/२००६ ने कळविली आहे.  तत्पुर्वी त्यांनी दि. १९/१/२००६ रोजी अध्यक्ष, अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष, सांगली मंडल कार्यालय, सांगली येथे तक्रार अर्ज विहित नमुन्यात म्हणजेच परिशिष्ट क्ष मध्ये केला आहे व त्यास पत्र क्र. २८५७ दि. २६/४/२००६ अन्वये कळविणेत आले आहे की, विनियमातील कलम ३.३ (एस.ओ.पी.) मधील तरतुदीनुसार अर्जदाराने विद्युत कंपनीकडे अंदाजपत्रकीय रक्कम भरावी अगर ओ.आर.सी. अंतर्गत अंदाजपत्रकीय रकमेच्या १५ टक्के रक्कम भरून मान्यताप्राप्त ठेकेदारांकडून स्वखर्चाने लाईन उभारणी करावी जेणेकरून तातडीने विद्युत पुरवठा करणेत येईल. असे वि.प.क्र. १ यांनी कळविले आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करता व वीज नियामक आयोगातील तरतुदीच्या आधारे व या मंचाचे अध्यक्ष व सदस्य–सचिव या दोन्ही पदाचा असलेल्या मताच्या आधारे मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

(ब) ग्राहक गा–हाणे निवारण मंच, कोल्हापूर परिमंडल, कोल्हापूर मंचाचा  सदस्य म्हणजेच ग्राहक प्रतिनिधी म्हणून मी माझे मत खालील प्रमाणे नोंदवित आहे व सर्वार्थाने याचा विचार गरजेचे आहे –

श्री. तेरवाडकर यांनी शेती पंपासाठी मौजे तिल्याळ, ता.जत येथे ३ एच.पी. मोटीव्ह पॉवर कनेक्शन मिळण्यासाठी वीज मंडळाकडे अर्ज केल्याचे दिसून येते. दि. १९/७/९९ रोजी एस.पी.अे.–१/११५७५७/२० /१९९९–२००० ने कोटेशन दिले .  सदरचे कोटेशन रू. ४,८४५/– दि. १४/८/९९ रोजी भरणा केलेले दिसून येते.  दि. १९/९/२००४ रोजी चाचणी अहवाल सादर केल्याचे वीज मंडळाने दिलेल्या माहितीच्या आधारे दिसून येते.  दि. ३/२/२००६ रोजी पत्र क्र. ९८७ ने कार्यकारी अभियंता, ग्रामीण विभाग, सांगली यांनी अर्जदाराने वीज नियामक आयोगाकडे केलेल्या दि. २/११/२००५ च्या अर्जास

अनुसरून उत्तर दिल्याचे दिसून येते. प्रतिक्षा यादीमधील २५७ क्रमांक असल्याचे कळविले आहे. त्याचप्रमाणे दि. २५/१/२००६ चे पत्र वीज वितरण कंपनीने हजर केले आहे. त्यात मे. भारत मेटल वर्क्स, सांगली, यांना १ कोटी ४९ लाख रूपयाचे



कार्यकंत्राट दिल्याचा विभागीय कार्यालयाकडून आदेश दिल्याचा उल्लेख आहे. शेती पंप उर्जिकरणासाठी साहित्य उपलब्ध नसलेचे कळविल्याचे दिसते. दि. ९/९/२००४ रोजी सअ/संवसु/संख/१०६० या पत्र क्रमांने वीज पुरवठयाबाबत अंतिम नोटीस दिल्याचे दिसून येते. त्यात १५ दिवसांचे आत विद्युत संच मांडणीचा अहवाल व मोटर व कपॅसिटर खरेदीची झेरॉक्स प्रत हजर करावी पूर्तता न झाल्यास आपणाला वीज जोडणीची गरज नाही असे समजून जेष्ठता यादीतील नांव कमी करण्यात येईल असा मजकूर असल्याचे दिसते. इतका सर्व पत्रव्यवहार पूर्ण करूनही जोडणी न मिळाल्याने तक्रारदाराने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष सांगली यांच्याकडे क्ष प्रपत्रामध्ये तक्रार केल्याची दिसून येते. त्याचा निर्णय झाल्यावर तक्रारदाराचे समाधान न झाल्याने तक्रारदार अ प्रपत्रामध्ये आपली तक्रार दाखल केली. शेती पंप उर्जिकरणाबाबत वीज वितरण कंपनी, महाराष्ट्र शासन, वीज नियामक आयोग यांची वेगवेगळी मते असल्यामुळे ६० दिवसांचे आत निर्णय होऊ शकला नाही. तरी सर्व संबंधिताकडून मते नोंदविल्यानंतर मंचाने निर्णय केला आहे.

तेंव्हा माझ्यासमोर दाखल झालेले कागद व सुनावणीच्या दरम्यान जे कागद दाखल केले गेले त्या आधारे मी सदस्य या नात्याने माझे मत नोंदविलेले आहे.

तक्रारदाराने १९९९ साली शेती पंपासाठी वीज मागणी केल्याचे दिसून येते. दि. १९/७/१९९९ ला कनेक्शन एसपीअे स्कीमखाली मंजुर झाल्याचे व रक्कम भरणा करण्याचे सांगितले व त्याप्रमाणे पूर्तता होऊनही त्याला २००५ पर्यंत वीज जोडणी मिळाली नाही ही वस्तुस्थिती आहे.

याऊलट वीज वितरण कंपनीने मटेरिअल उपलब्ध नसल्यामुळे तसेच शासन व मुख्य कार्यालय यांच्या धोरणानुसार उद्‌दिष्टा प्रमाणेच जोडण्या दिल्या जात असल्याचा खुलासा केला आहे. ग्राहकाने वीज जोडणी न मिळाल्याने कृती मानका प्रमाणे दंडाची आकारणी व्हावी व वीज जोडणी मिळावी अशी आग्रही भूमीका घेतली आहे.

दि. १४/८/१९९९ रोजी चाचणी अहवाल व कोटेशन भरून ग्राहकाला १९/९/२००४ रोजी पत्र पाठविणे इतका प्रदिर्घ कालावधी जाऊनही त्यानंतर अद्यापही वीज जोडणी दिली नाही. पूर्वीच्या वीज मंडळाने किंवा आताच्या वीज वितरण कंपनीने २००६ पर्यंत कोणताही पत्रव्यवहार केल्याचे दिसून येत नाही. ग्राहकाने अंतर्गत कक्षाकडे तक्रार केल्यावर कक्षाकडील सुनावणीच्यावेळी रू. ५१,३००/- इतका खर्च अर्जदाराने केल्यास किंवा अधिकृत परवाने धारकाकडून स्वत:च्या खर्चाने वीज जोडणीचे काम पूर्ण करून खर्चाच्या १५ टक्के रक्कम वीज वितरण कंपनीकडे जमा केल्यास वीज जोडणी देता येईल असे स्पष्ट केले आहे.

३ एचपी शेती पंपासाठी शेतकरी ग्राहकाने रू.५१,३००/- + १५ टक्के सुपरव्हिजन चार्जेस इतकी रक्कम भरणे शक्य आहे का ? तसेच त्यांनी तक्रार केल्यावर सदरची मागणी नोंदविल्याचा उल्लेख आहे. तथापि पूर्वीच्या अशा मागणीचा पत्रव्यवहार कंपनीने दाखल केला नाही. महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार डार्क वॉटर शेड मधील कृषी पंपाना नवीन वीज जोडणीस मनाई असल्याचे व वीज वितरण कंपनीकडे निधी व साहित्य उपलब्ध नसल्याचे सांगितल्यामुळे कृती मानके २००५ प्रमाणे केवळ दंडात्मक कार्यवाही करणे एवढाच भाग शिल्लक राहतो. तथापि नुसता दंड करूनही व्यवस्थेमध्ये सुधारणा होईल असे माझे मत नाही. शेती पंपासाठी एकाच ग्राहकाचा अर्ज नाही उपलब्ध माहितीनुसार १.७५ लाख शेतकरी ग्राहकाने सर्व पूर्तता केली आहे. त्यामुळे सर्वांसाठी सर्वसमावेशक धोरण ठरविणे आवशक्य आहे. कृती मानके २००५ मध्ये शेतकरी ग्राहक अशी वर्गवारी

नसल्याने सरसकट सर्वजण तक्रार नोंदविणार. सर्व कागदपत्रे फीरून निर्णय कांहीही होणार नसल्याने काथ्याकूट होत आहे. जर आपल्याकडे वीज, निधी, मटेरिअल उपलब्ध नाही तर एवढया मोठया प्रमाणात अर्ज का स्वीकारले जातात असा प्रश्न उभा राहतो. कार्यालयीन विलंब झाल्याचे तसेच ग्राहकास योग्य वेळी प्रतिसाद दिल्याचे दिसून



येत नाही. १९९९–२००० साली एस.पी.अे. मध्ये मंजुर झालेल्या ग्राहकास निधी उपलब्धतेअभावी वीज जोडणी मिळत नाही व सत्वर पाहिजे असल्यास कायद्याचा आधार घेऊन मोठी रक्कम खर्च करण्यास सांगणे व त्यावरही १५ टक्के सुपरव्हिजन चार्जेस घेणे हे तर्कसंगत वाटत नाही.

शासन, वीज वितरण कंपनी, वीज नियामक आयोग यांनी एकत्रित बसून धोरणात्मक निर्णय घेणे गरजेचे आहे. तसेच वीज वितरण कंपनीतील दप्तर दिरंगाईबद्दलही योग्य वाटचाल आवशक्य आहे.

या मंचाला दिलेल्या विहीत मुदतीत म्हणजेच ६० दिवसांची कालमर्यादा पूर्ण होऊनही निर्णय होऊ शकला नाही कारण वितरण कंपनी व वीज नियामक आयोग यांच्याकडील पत्रव्यवहारामळे निर्णयास विलंब झालेला आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करता मंचाने खालील निर्णय बहुमताने मंजुर केला आहे.

## <u>आदेश</u>

१) तक्रारदार श्री. विठ्ठलराव गोपाळराव तेरवाडकर, मु.पो. तिल्याळ, ता.जत, जि.सांगली, यांनी महाराष्ट्र वीज नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठयाच्या इतर अटी) विनियम–२००५ च्या कलम ३.३ अन्वये वितरण कंपनीकडे अंदाजपत्रकातील सर्व रक्कम भरावी अथवा ओ.आर.सी. अंतर्गत १५ टक्के देखभाल रक्कम भरून मान्यताप्राप्त ठेकेदारांकडून स्वखर्चाने लाईन उभारणी करावी. या सर्व बाबींची तक्रारदाराने पूर्तत करताच वितरण कंपनीने तातडीने वीज पुरवठा करावा.

२) तक्रारदार यांनी वितरण कंपनीकडे विलंबाबतची दंड आकारण्याची केलेली मागणी सदर तक्रारीबाबत लागू होत नसल्यामुळे त्यांनी केलेली भरपाईची मागणी या मंचाकडून फेटाळण्यात येत आहे.

३) प्रस्तुतचा निर्णय तक्रारदार यांना मान्य न झाल्यास त्यांना या आदेशाचे तारखेपासून ६० दिवसांचे आत लोकपाल (ओम्बुडस्मन) मुंबई यांचेकडे दाद मागता येईल. तसेच वि.प. यांना सदरचा निर्णय अमान्य झाल्यास त्यांना मा. ना.उच्च न्यायालय, मुंबई अथवा दिवाणी न्यायालयात दाद मागता येईल.

(जी. सी. लेले)
सदस्य
ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर

(एम.बी.भाजीभाकरे)
सदस्य – सचिव
ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर